# प्रेसनोट

दिनांक २२/०७/२०२१

## लाच स्विकारले प्रकरणी कराड शहर तलाठी कार्यालयातील खाजगी इसम यांचेवर कारवाई

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | पुणे परीक्षेत्र, सातारा युनिट |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | कराड शहर पोस्टे गु.र.नं.४३५/२०२१ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ अ प्रमाणे |
| **आरोपींचे नाव व कार्यालय** | **सुनिल श्रीधर पाटील,** वय ४१ वर्षे, कराड शहर तलाठी कार्यालयातील खाजगी इसम रा.१९, बुधवार पेठ कराड यांना लाच स्विकारले प्रकरणी रंगेहात पकडले.<br>सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई. |
| **घटनास्थळ** | कराड शहर तलाठी कार्यालय |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १०,०००/- रुपये (दहा हजार रुपये) |
| **लाच स्विकारली रक्कम** | ८०००/- रुपये (आठ हजार रुपये) |
| **थोडक्यात माहीती** | यातील आरोपी खाजगी इसम हा कराड नगर परीषद कराडचे इमारतीत असले तलाठी कार्यालयात कराड शहर सजाचे जंगम तलाठी यांचे हाताखाली कामास असुन तक्रारदार यांचे वडीलांचे नावे कराड शहर सिटी सर्व्हे नं.३४१ अ/२ ३ ब मध्ये १२८.९३ चौमी वर असलेल्या जागेवरील इमारतीचे सातबारा उता-यावरील दि.कराड अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक कराड यांचा बोजा कमी करुन त्यावर तक्रारदार यांचे पत्नीचे नावे सदरची जागा व इमारत होवुन त्यावर दि.कराड अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि.कराड यांचा बोजा चढवुन तसा सातबारा उतारा तलाठी कार्यालय कराड येथुन मिळवुन देण्यासाठी बेकायदेशीर मार्गाने आपल्या वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन काम करुन देण्यासाठी आरोपी खाजगी इसम यांनी पडताळणी मध्ये १०,०००/- रु.ची लाचमागणी करुन तडजोडीअंती ८०००/- रु. लाचरक्कम स्विकारताना रंगेहात पकडले आहे. |
| **सापळा पथक** | सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक तसेच मा.सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री.अशोक शिर्के, पोनि अविनाश जगताप, सहा.पोलीस उपनिरीक्षक आनंदराव सपकाळ, काटवटे, पो.ना विनोद राजे, प्रशांत ताटे, विशाल खरात, पो.काँ.संभाजी काटकर, निलेश येवले, तुषार भोसले, निलेश वायदंडे सर्व नेमणुक ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधीत काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य शी संपर्क करावा.

संपर्क पत्ताः- सि.स.नं ५२४/अ, जिल्हा कोषागार कार्यालयाजवळ, सदरबझार सातारा

संकेत स्थळ :- acbmaharashtra.gov.in

ईमेलः- dyspacbsatara@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप :-www.acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांकः- ०२१६२-२३८१३९

मा.सादर

(अशोक शिर्के)

पोलीस उपअधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा.